Vol 7 Issue 1 Feb 2017

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 1 | FEBRUARY - 2017

# लोकसाहित्य संशोधनाचे महत्व

प्रा. डॉ. राजाराम राठोड
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर.

## प्रस्तावना

बदलाचा वेग आज खूप वाढला आहे. विकिपीडिया व तत्सम मुक्त ज्ञानकोशामुळे ज्ञान क्षेत्रावरील मक्तेदारी संपुष्टात येत आहे. माहितीचे साठे उपलब्ध होत आहेत. असे असले तरी अधिकाधिक अचूकतेचा शोध व त्याची भूक वाढत आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रात संकल्पनांची फेरतपासणी होत आहे. नवीन ज्ञानाच्या शोधाबरोबरच उपलब्ध ज्ञानाचा अर्थ नव्याने, पुन्हा नव्याने मांडला जात आहे. याबाबतीत लोकसाहित्य या विषयात संशोधनाची संधी खुणावत आहे. लोकसाहित्याचे प्रारंभीचे संशोधन संकलन व संकल्पनांची मांडणी यातच विस्तारलेले दिसत. ते महत्वपूर्ण आहेच. पण शरीर विज्ञान, मानस विज्ञान याबरोबरच लोकमानस विज्ञान याचा अभ्यास महत्वपूर्ण ठरत आहे. लोकसाहित्य ही ज्ञानशाखा विस्तारत आहे.

## उद्दिष्टे

१. लोकसाहित्य अभ्यासाचे महत्व विशद करणे.
२. लोकसाहित्यातील संशोधनाच्या क्षेत्राचा आढावा घेणे.
३. लोकसाहित्यातील संशोधनाच्या क्षेत्रातील नव्या दिशांबाबत मत मांडणे.
४. लोकसाहित्य संप्रेषणाचे महत्व स्पष्ट करणे.
५. लोकसाहित्याच्या उपलब्ध सामग्रीच्या नव्या अर्थाच्या शोधाचे महत्व नमूद करणे.

## लोकसाहित्य संशोधनाचे महत्व

विद्यापीठ पातळीवरील पदवी व पदव्युत्तर स्तरावर एक सोपा विषय म्हणून लोकसाहित्याकडे पहिले जाते. पण इतिहास, तत्वज्ञान, विज्ञान, बदलती जीवनशैली, बदलती जीवनमूल्ये या संदर्भात लोकसाहित्य विषयाचे व त्यावर भाष्य करण्याच्या जबाबदारीचे भान यावे. लोक बदलत नाही, लोकमानस बदलत नाही किंवा हा बदल खूपच संथ गतीने होतो. असे का होते? याचे उत्तर लोकसाहित्य अभ्यासातून मिळू शकेल.



लोकमानसावरील प्रभाव त्याला कारणीभूत आहे. असे सामान्य आणि सर्वमान्य उत्तर आपल्याला मिळते. पण लोकमानसाला प्रभावित का करता येत नाही. किंवा ते कोणत्या पद्धतीने करता येईल? याची कारणे समाजशास्त्र, मानसशास्त्र, न्युरो सायन्स आदि शास्त्राच्या अभ्यासातून मिळू शकते. मानवी मेंदू कसे काम करतो. याचे उत्तर ज्ञानेन्द्रीयाधारे, असे म्हणता येते. पण हे कसे होते. मेंदू ज्ञानेंद्रियाकडून मिळणाऱ्या माहितीचे पॅटर्न तयार करून त्यांच्या संवेदना साठवतो. अशा साठवल्या गेलेल्या संज्ञा तथा पॅटर्न तो दृढ करतो. तो हे दृढ करणे स्वतः पुरते करत नाही तर इतरांना ते पटवतो. हे पटलेले पॅटर्न पिढी दर पिढी संक्रमित होतात. मग एखादा तत्वज्ञ, शास्त्रज्ञ या ठासीव— घडीव पॅटर्नला धक्का देतो. तो पर्यंत ठासीव पॅटर्नवर विधी विधाने दृढ होतात. त्यातून लाभ घेणारा चतुर गट तयार होतो. लाभाआड येणाऱ्या, धक्का देणाऱ्या पॅटर्नचा तो विरोध करतो त्याची जगाच्या इतिहासात अनेक उदाहरणे उपलब्ध आहेत. हे पॅटर्न तयार करण्यात भाषिक संप्रेषणाचा मोठा वाटा असतो. भाषेत सूचकता असते. सापेक्षतेमुळे त्याचे अर्थ काय लावायचे हे धनिक तथा प्रभावी गट ठरवतो. याला विरोध करणारा गट ही भाषिक मध्यामांतून आपली कृती करत असतो. या सर्वांची उदाहरणे लोकसाहित्यात सापडतात. त्याचा अन्वयार्थ लावणे महत्वाचे आहे. मी भटक्या जमातीतील लोकगीतांचा अभ्यास करताना संकलनात कुडमुडे जोशी यांचे गीत ध्वनिमुद्रित केले. ते असे—

चीरेदार कोठार चालू दे
सत्तावीस किडे जबजब्यात जाऊ दे
नवगडाच्या पायऱ्या होऊ दे
चुडा जोडा जलमाला जाऊ दे
बालबच्चे सुखाचे राहू दे
अनुग्रहाच्या पायऱ्या होऊ दे
अन सवर्णाचा घाट वाजू दे
इंद्रपुरी दान पोचू दे
ब्रम्हपुरी दान पोचू दे
बारा अमुस्या, बारा पोर्णिमा
शिवसतळ जाऊ दे
पंचगंगेला, कृष्णा—कोयनेला,
गंगा गोदावरीला,
वाळवंटीला, चंद्रभागेला,
मीरा—भिवरेला, विठ्ठल पायरीला
नामदेवाला, कुंडलिकाला
वासुदेव हरीला, पाली पिंगळेनाथाला,
गुरुदेव दत्त, दिगंबरा, सदगुरू'१

आशीर्वाद देणारे हे भाषिक पॅटर्न म्हणू या. अशी पॅटर्न परंपरा आपणाला दिसते. इथे भाषेबरोबरच, लय म्हणजे ध्वनीसंवेदनेला महत्व आहे. पिंगळे जोशी यांचा पेहराव दृश्य संवेदना, त्यांचे लयीत गायन ध्वनी संवेदना, पहाटेची वेळ स्पर्श संवेदना याचा हा परिणाम. यातून पारंपरिक मिळकत असल्याने या पॅटर्नची पुनरावृत्ती आणि लोकमानसावर ठसा. ही घडण लोकगीते करतात.

## लोकसाहित्य संशोधनाची क्षेत्रे

लोकसाहित्य संशोधनाचा प्रारंभ सतराव्या शतकापासून झालेला आहे.

प्रामुख्याने समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, धर्मशास्त्र या अभ्यास विषयासाठी लोकसाहित्याचा अभ्यास झाला. संस्कृती शोधाची प्रेरणा या संशोधानामागे होती. लोकगीतांचे संकलन, विश्वास–समजुती यांचा संग्रह असे स्वरूप प्रारंभीच्या संशोधनाचे होते. जर्मनीच्या ग्रीम बंधूनी लोककथा, लोकगीतांचे संकलन करून त्याचा भाषा व धर्म यांच्याशी परस्परसंबंध स्पष्ट केले. १८२६ ला होम्स यांनी 'एव्हरी डे बुक' पुस्तकांच्या माध्यमांतून मनोरंजक कथा आणि समजुती प्रकाशित केल्या. १८४६ ला विलियम जॉन थोमास यांनी थ्वसासवतम हा शब्द सुचविला. १८८८ ला फोकलोअर सोसायटीची अमेरिकेत स्थापना झाली. ही बाब लोकसाहित्य संशोधनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरली.

१६ व्या शतकात लोकसाहित्याच्या अभ्यासाचे काही दृष्टीकोन निश्चित झाले.

१. सांस्कृतिक मानवशास्त्रीय दृष्टीकोन
२. धर्मशास्त्रीय दृष्टीकोन
३. मानसशास्त्रीय दृष्टीकोन
४. समाजशास्त्रीय दृष्टीकोन
५. ऐतिहासिक दृष्टीकोन२

### *लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशा*

लोकसाहित्य हा मुळात साहित्य तथा भाषाभ्यासाचा विषय नाही. मुळात तो मानववंशशास्त्राचा विषय आहे. ब्नसजनतंस ।दजीतवचवसवहल असे लोकसाहित्य अभ्यासशाखेला म्हटले जाते. मानववंशशास्त्राच्या दोन शाखेपैकी ही एक शाखा आहे. लोकसाहित्याच्या नव्या दिशांबाबत 'लोकाविद्या' हा द. वा. पोतदार यांनी सुचविलेला शब्द अधिक योग्य आहे असे वाटते. केवळ लोककथा, लोकगीते आदींबाबत लोकसाहित्य मर्यादित नाही. त्यात सुताराचं साहित्य, सोनाराचं साहित्य, देवपूजेच साहित्य आदींचा समावेश होतो. या मध्ये सांस्कृतिक कृती दडलेली असते.

### *लोकसाहित्य व संस्कृती*

लोकसाहित्याच्या अभ्यासातून संस्कृतीचा अभ्यास करता येतो. पेहराव, खानपान, सण द्ृ उत्सव, जत्रा, यात्रा, प्रथा, परंपरा, विधी, लोकतत्वे, जादू, विश्वास, अंधविश्वास, भाषा इ. संस्कृतीतील अंगाचा अभ्यास लोकसाहित्य अंतर्गत करता येतो. त्यासाठी लोकगीते, म्हणी, उखाणे, लोककथा इ. चा अभ्यास उपकारक ठरतो. जतन करणे हे लोकसाहित्याचे महत्वाचे अंग आहे. त्यामुळे लोकसाहित्यात पुनरावृत्तीला महत्व आहे. ही पुनरावृत्ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत लोकसाहित्याचे प्रचलन वाढविते. मराठी विश्वकोशात संस्कृती या संकल्पनेची चर्चा केलेली आहे. एडवर्ड बेर्नेट टायलर याने इ. स. १८७२ मध्ये या संकल्पनेची व्याख्या प्रिमिटिव्ह कल्चर या पुस्तकाच्या प्रारंभीच्या वाक्यात दिली आहे. तो म्हणतो, ''विशालतर मानववंशीय–भौगोलिक दृष्टिकोनातून पाहिल्यास, ज्ञान, धर्मविश्वास, कला, नीती, कायदे, आचार आणि मानवाने समाजाचा सदस्य म्हणून जे संस्कार, समर्थता व सवयी आत्मसात केलेल्या असतातय त्या सर्वांचा समग्र व संमिश्र परिपाक म्हणजे 'संस्कृती ऊर्फ सभ्यता होय''. लिंटन म्हणतो, ' संस्कृती म्हणजे सामाजिक आनुवंशिकता होय, तर ' सामाजिक परंपरेचे सामग्य म्हणजे संस्कृती ' असे लोई म्हणतो.३ या सर्व संस्कृतीच्या अंगावर बऱ्याच अंशाने लोकसाहित्य अभ्यासाने प्रकाश टाकता येतो. एडवर्ड टायलर, अँड्र्यू लँग आणि जेम्स फ्रेझर यांनी लोकसाहित्याला संस्कृतीच्या अभ्यासाचे महत्वाचे साधन मानले होते. लोकसाहित्य हे संस्कृतीचे सातत्य टिकविण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे असे मत फ्रांस बोआस यांनी मांडले आहे.४ तर लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. शरद व्यवहारे यांनी 'लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास.' असे म्हटले आहे.५ ते पुढे म्हणतात ' संस्कृतीचे सातत्य व तिच्यात होणारे बदल यांचे निरीक्षण लोकसाहित्यात करता येते.

### *लोकसाहित्य व साहित्य*

लोकसाहित्य व साहित्य यांचा अभ्यास परस्परपूरक आहे. मुद्रित साधने उपलब्ध होण्यापूर्वी मौखिक परंपरेनेच साहित्य लोकांपर्यंत पोहचले व त्यांचा प्रसार झाला. मराठी साहित्याच्या बाबतीत लोकसाहित्याचा प्रभाव अधोरेखित करता येतो. भाषिक अभिव्यक्ती, भावनांचा अविष्कार, भाषिक कृती, भाषा विकास याबाबत लोकसाहित्याचे महत्व सांगता येते. लोकविश्वास, लोकश्रद्धा, विधी, सण–उत्सव, आचार–विचार, रूढी–प्रथा, विविध कला, जादू–टोणा यासारख्या बाबी साहित्यात येत नाहीत. त्या लोकसाहित्यात येतात. लोकसाहित्यातून मानवी अनुभवाचे दर्शन घडते.

### *बंजारा लोकसाहित्य : गुळीं*

बंजारा लमाणी या भटक्या जमातीत 'गुळीं' (मराठीत गोणी पण हाताने विणलेली असल्याने अतिशय मजबूत) ला दैवताचे स्थान आहे. मुळचे राजस्थानचा असलेला हा समूह मध्ययुगात रसद पुरवण्याचे कार्य करीत असे. त्याला गोर बोलीत 'लदेणी' म्हणतात. गाईच्या किंवा बैलाच्या पाठीवर धान्य लादून नेण्याचे काम तो परंपरेने करीत असे. या कामी धान्य वाहून नेण्यासाठी हाताने विणलेल्या मजबूत गोण्यांची आवश्यकता असे. या गोण्यात पावसाचे पाणी आत जाऊ शकत नाही. या गोणीची पूजा या समूहात केली जाते. दिवाळीचा दिवा या गोणीवर ठेवला जातो. त्याला पाय लागू देऊ नये असा संकेत आहे. लग्नात हळदीच्या पूर्वी आदल्या रात्री 'डाग देयेरो' विधी असतो. त्यावेळी नवरदेवाला तयार केले जाते. नवरदेवाच्या धाकट्या भावास सुई तापवून दंडावर डाग दिला जातो. सख्खा भाऊ नसेल तर चुलत भावाच्या दंडाला डाग दिला जातो. चुलत भाऊ नसेल तर 'गुळीं' ला डाग (चटका) दिला जातो. 'गुळीं' या एका साहित्याची ही सांस्कृतिक ओळख अशी स्पष्ट होत जाते.

लोकसाहित्याचे संशोधन आता ऑनलाईन होणे गरजेचे आहे. ध्वनीमुद्रित, ध्वनीचित्रमुद्रित, मुद्रित, भाषांतरित स्वरुपात ऑनलाईन डाटा गरजेचा आहे. यातून जगभर देवाण–घेवाण होऊन मानवी संस्कृतीचे पैलू जगासमोर येतील.

संस्कृतीचे जतन करण्यासाठी लोकसाहित्य संशोधन असा ही उद्देश असतो. पण हे जतन अनैतिकतेचे नको. लोकसंस्कृतीचे उपासक असे म्हणायचे पण प्रत्यक्षात मात्र त्यांची अवस्था मागत्याची असते. याचा अन्वयार्थ नीट लावला पाहिजे. विज्ञान आणि मानवी मुल्ये समोर ठेऊन उपलब्ध सामग्रीचा अर्थ लावला पाहिजे.

### *लोकसाहित्य संप्रेषण*

लोकसाहित्य एका पिढी कडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक परंपरेने संक्रमित होते. हे एक संप्रेषण आहे. संवादाचे प्रभावी माध्यम म्हणून लोकसाहित्याचा अभ्यास करता येऊ शकतो. पण त्याचा योग्य अन्वयार्थ लावला गेला पाहिजे. तत्कालीन समाजाची गरज म्हणून लोकसाहित्य निर्मितीकडे पहिले पाहिजे. लोकसाहित्यातील संप्रेषण समूह मनाला आवाहन करणारे आहे. त्यातून संस्काराची शिदोरी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित

VOLUME - 7 | ISSUE - 1 | FEBRUARY - 2017

होते.

## सारांश

लोकसाहित्याचे संशोधन सांस्कृतिक मानववंशशास्त्राच्या अभ्यासासाठी महत्वपूर्ण आहे.

## संदर्भ


१. राजाराम राठोड, भटक्या जमातींची लोकगीते , पृष्ठ ११३, ११४
२. विश्वनाथ शिंदे– लोकसाहित्यमीमांसा भाग – १, पृष्ठ – ११
३. लक्ष्मणशास्त्री जोशी , मराठी विश्वकोश खंड १८ (नोंद – संस्कृती) – ऑनलाईन आवृत्ती https://marathivishwakosh-maharashtra-gov-in/khandas/khand18
४. डॉ. प्रभाकर मांडे – लोकसाहित्य रू संकल्पना आणि स्वरूप – पृष्ठ ३६
५. डॉ. प्रभाकर मांडे – लोकसाहित्य रू संकल्पना आणि स्वरूप – पृष्ठ ३६





प्रा. डॉ. राजाराम राठोड
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org